**विशेष लेख क्र.१४४** ३ भाद्रपद १९२९ शके (सायं.५.३० वा.)
शनिवार, दि. २५ ऑगस्ट २००७

## 'स्टेप' महिलांच्या आर्थिक विकासातील महत्वाकांक्षी पाऊल

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत महिलांच्या विकासासाठी योजना राबविण्यात येतात. यात प्रामुख्याने व्यवसाय - तंत्र शिक्षण, आरोग्य विषयक शिक्षण, स्वच्छता कार्यक्रम यावर भर देण्यात येतो. महिलांच्या सर्वागीण विकासासाठी, समाजातील दुर्बल घटकातील महिलांना न्याय देण्यासाठी ग्रामीण स्तरावरही विविध योजना राबविण्यात येतात. या साऱ्याच प्रयत्नांतून महिलांचे सामाजिक जीवन उंचावण्याचा प्रयत्न केला जात असतो.

काही काम किंवा नोकरी-व्यवसाय करण्याच्या निमित्ताने जेव्हा महिला घराबाहेर पडते किंवा घरी राहून असे काही काम करण्याचा निश्चय करते त्यावेळी तिला गरज असते ती प्रशिक्षणाची ! तिच्यातील अंगभूत सामर्थ्य, कल ओळखून त्याला अनुरुप असे मार्गदर्शन आणि त्याबरोबरच वित्तीय संस्थामार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्याचीही गरज असते. आज बचतगटांच्या माध्यमातून महिलांनी अनेक प्रकारचे उद्योग-व्यवसाय सुरु केले आहेत. लाखोच्या संख्येने महिला संघटित होत आहेत. कार्यक्षम आणि सक्षम महिलांची हीच शक्ती देशाचे आणि कुटुंबाचे भविष्य उज्ज्वल करण्यास हातभार लावीत आहे.

महिलांमधील ही क्षमता ओळखून त्यांचा आर्थिक स्तर उंचावणारी आणखी एक पायरी म्हणजे 'स्टेप' अर्थात 'सपोर्ट टू एम्प्लॉएमेंट प्रोग्राम फॉर विमेन्स' म्हणले महिलांना रोजगारविषयक कार्यक्रमात सहाय्य करणारी ही योजना. ही केंद्रशासनाची योजना आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांमधील कसब हेरून त्यांची व्यावसायिक कार्यक्षमता आणि गुणवत्ता वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे. महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहून सक्षम होऊ शकतील यादृष्टीने या योजनेत प्रयत्न करण्यात येतात. योजनेमध्ये महिलांना पशुपालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, हस्तकला, रेशमी किड्यांचे पालन, खादी-ग्रामोद्योगातील वस्तुंचे उत्पादन यासारख्या विषयातील प्रशिक्षण देण्यात येते. ही योजना स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येते.

...२/-

**‘स्टेप’ महिलांच्या आर्थिक**

योजनांतर्गत लाभार्थींना प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता, त्यासाठी कर्मचारी वर्गाची नियुक्ती, कच्च्या मालाची उपलब्धता, पूरक सेवांची उपलब्धता करुन दिली जाते. यासाठी केंद्रशासनाकडून एकूण खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुदान म्हणून दिली जाते. हे अनुदान दोन टप्प्यात दिले जाते. उर्वरित दहा टक्के रक्कम ही स्वयंसेवी संस्थांनी उभारावयाची असते. ही योजना राबवावयाची झाल्यास कमीतकमी ५०० आणि जास्तीत जास्त १,००० महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे.

राज्यात मुंबई, कोल्हापूर आणि नागपूर अशा तीन ठिकाणी या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये कोल्हापूरच्या ‘कागल एज्युकेशन सोसायटी’ ला अळिंबी प्रकल्पासाठी, मुंबईच्या ‘महाराष्ट्र राज्य दूध महांसघ मर्यादित’ ला डेरी प्रकल्पासाठी तर नागपूरच्या ग्रामीण विकास संशोधन आणि प्रबोधन संस्थेस कुक्कुटपालन प्रकल्पासाठी अनुदान देण्यात आले आहे.

शासनाने या योजनेसाठी आणखी १७ प्रस्ताव सादर केले आहेत. यामध्ये धुळे, कोल्हापूर, नागपूर, अहमदनगर, लातूर, पुणे, मुंबई, बीड आणि औरंगाबाद जिल्ह्यातील विविध संस्थांचा समावेश आहे. केंद्र शासन स्तरावर हे प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहेत.

थोडक्यात महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करतांना त्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये विकसित करण्याच्या अनुषंगाने ही योजना अतिशय उपयुक्त असून महिलांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घेणेय गरजेचे आहे. महिलांच्या विकासाच्या दृष्टीने ‘स्टेप’ योजना म्हणजे खऱ्या अर्थाने उचललेले गेलेले आणखी एक महत्वाकांक्षी पाऊल आहे.

**- डॉ.सुरेखा मुळे**
**वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)**

-------------

महाले/२५ ऑगस्ट, २००७